महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर

## District Institute of Education & Training, Padampura, Chhatrapati Sambhajinagar

**दुरध्वनी क्रमांक : ०२३४ २२२७७४** **E mail -** dietaurangabad@maa.ac.in

जा.क्र.जिशिप्रसंछसं/शिक्षकस्पर्धा/ॲनिमेशन2025-26/१०५६ दिनांक: - 25 /10/2025

**प्रति,**

1. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
2. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि. प. (सर्व),
3. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि. प. (सर्व),
4. प्रशासनाधिकारी, मनपा/ नपा, (सर्व)
5. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)

**विषय:- शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करणेबाबत.**

संदर्भः 1. राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020.
2. राज्य अभ्यासक्रम आराखडा 2024.
3. शासननिर्णय क्र. संकीर्ण 2024/प्र.क्र.10/एसडी-6 मंत्रालय, मुंबई दि. 15 मार्च 2024 (SQAAF)
4. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील जा.क्र. राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/2025 - 26, दिनांक 10/10/2025 चे पत्र
5. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक 14/10/2025 रोजीच्या Online बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा या एकूण 42 विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी / कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे.शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या **www.maa.ac.in** या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन 2025-26 वर्षापासून एकूण 42 स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यात आयोजित करण्यात येत आहे. याबाबत संबंधित मार्गदर्शक सूचना पत्र अनुसार तालुका स्तरावर सदर स्पर्धांचे आयोजन करणे अपेक्षित आहे.

सदर 42 स्पर्धापैकी ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे देण्यात आलेली आहेः त्यानुसार ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धेचे आयोजन तालुका वा मनपा स्तरावर दि. 21 नोव्हेंबर 2025 रोजी नियोजनानुसार करण्यात यावे. सदर स्पर्धेच्या आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० व राष्ट्रीय व राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या (NCF/SCF) पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक वापर आवश्यक ठरत आहे. शिक्षकांनी अध्यापनात डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करावा, त्यातून उपयुक्त, विद्यार्थिकेंद्रित सादरीकरण कौशल्ये विकसित व्हावीत, तसेच अधिकाऱ्यांनी सुयोग्य ठिकाणी ॲनिमेशनचा वापर करावा, यासाठीच राज्यस्तरीय ॲनिमेशन सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**स्पर्धेचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे असेल.**

शिक्षकांच्या सर्जनशील सादरीकरण कौशल्यांना व नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, जेणेकरून अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विदद्यार्थिकेंद्रित होईल.

**पात्रता निकष**

महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी मान्यता प्राप्त शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षक ज्याचा सेवार्थ / शालार्थ आयडी उपलब्ध आहे, पात्र असतील तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अधिकारी कर्मचारीदेखील या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. **एक शिक्षक एकच स्वतःचे तयार केलेलं Animation सादरीकरण सादर करू शकतील.**

**महत्त्वाचे नियम :**

- प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी आपला वयैक्तिक Laptop सोबत घेऊन स्वतः तयार केलेले Animation सादर करणे आवश्यक आहे.
- **आपण अध्यापन करत असलेल्या किंवा विद्यार्थांना उपयुक्त अशा कोणत्याही घटकावर आपण स्वतः तयार केलेले Animation स्पर्धत सादर करावयाचे आहे.**
- **Animation स्वतः तयार केलेले असावे.**
- सहभागी स्पर्धकाने नाव, पदनाम, शाळेचे/कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा, युडायस कोड, शालार्थ /सेवार्थ आयडी, मोबाइल क्रमांक, सादरीकरण विषय सादरीकरणाच्या सुरुवातीस समाविष्ट करावा.
- भाषेचा पर्याय मराठी, इंग्रजी किंवा हिंदी.
- सादरीकरणाचा कालावधी ५ मिनिटांचा, जणू काही विद्याथ्यांसमोर, प्रेक्षकांसमोर प्रत्यक्ष सादर करत आहे असे गृहीत धरून सादरीकरण करावे.
- कोणत्याही निवड समिती सदस्य शिक्षकास स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही.
- सहभागी शिक्षक स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून Animation सादरीकरण करतील.
- इंटरनेटवरील संसाधनांचा वापर अनुमत, मात्र कॉपीराईट नियमांचे पालन आवश्यक.
- सादरीकरण कालमर्यादा व नियमांचे अचूक पालन आवश्यक.
- कॉपीराईटचे उल्लंघन झाल्यास स्पर्धेतून बाद.
- कोणत्याही गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
- स्पर्धेकरिता नाव नोंदणीसाठी राज्यस्तरावरून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.
- केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाचे नांव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.
- स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभागी होणेसाठी प्रोत्साहित करण्यात यावे.
- केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.
- दि. ३० ऑक्टोबर, २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

- तालुकास्तरावरील स्पर्धाची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील.
- तालुका स्तरावर प्रथम येणाऱ्या स्पर्धकाची निवड विभागीय स्तरासाठी केली जाईल.
- विभागीय स्पर्धेचे ठिकाण विभागीय DIET मार्फत कळविण्यात येईल .
- **तालुकास्तरीय स्पर्धेसाठी योग्य तीन परीक्षकांची नावे अंतिम करून DIET छत्रपती संभाजीनगरकडे बायोडाटासह दिनांक ३०/१०/२०२५ पर्यंत पाठवावी, तसेच स्पर्धेचे ठिकाणही कळवावे.**
- परीक्षकांसाठी SCERT, पुणे यांचेकडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारीत मानधन देण्यात येईल.
- परीक्षणासाठी खालील मुल्यांकन निकष असतील.
- **Animation सादरीकरण मुल्यांकन खालील Rubrics नुसार होईल ,**

**मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता (Rubrics)** **एकूण गुण : १००**

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | २५ |
| २) | शैक्षणिक उपयुक्तता (Pedagogical Value) | २० |
| ३) | दृश्यरचना व सौंदर्य (Visual Design and Aesthetics) | १५ |
| ४) | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity and Originality) | १० |

| अ. क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| ५) | तांत्रिक बाजू (Technical Execution) | १० |
| ६) | सादरीकरण कौशल्ये (Presentation Skills) | १० |
| ७) | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | १० |
| एकूण | | १०० |

**रुब्रिक तपशिलानुसार मूल्यांकन श्रेणी :**

**१) सामग्रीची गुणवत्ता** **२५ गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| २१-२५ | माहिती अत्यंत अचूक व सखोल, विषयाशी पूर्णतः सुसंगत, राष्ट्रीय शिक्षण धोरणांशी (NEP, NCF, SCF) सुसंगत |
| १६-२० | माहिती अचूक व विषयाशी सुसंगत, सखोलता थोडी कमी |
| ११-१५ | काही मुद्दे सामान्य किंवा अस्पष्ट, थोडे विषयांतर |
| ०-१० | माहिती अपूर्ण/चुकीची, विषयाच्या मुख्य मुद्द्यांपासून दूर |

**२) शैक्षणिक उपयुक्तता** **२० गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| १७-२० | शिकवण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त नावीन्यपूर्ण दृष्टिकोन व पद्धतींचा वापर व स्पष्ट उद्दिष्टे असणारी मांडणी |
| १३-१६ | उपयुक्तता चांगली; काही प्रमाणात नावीन्य |
| ९-१२ | काही प्रमाणात उपयुक्त, उद्दिष्ट थोडी अस्पष्ट |
| ०-८ | शैक्षणिक वापर स्पष्ट नाही, उद्दिष्टांचा अभाव |

**३) दृश्यरचना व सौंदर्य** **१५ गुण**

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| १३-१५ | अत्यंत आकर्षक व संतुलित मांडणी, उत्कृष्ट फॉन्ट, रंग व ग्राफिक्स |
| १०-१२ | चांगली मांडणी, काही सुधारणा शक्य |
| ६-९ | सामान्य रचना, थोडी असमाधानकारक मांडणी |
| ०-५ | गोंधळलेली, असमंजस रचना, वाचन सुलभतेचा अभाव |

### ४) सर्जनशीलता व मौलिकता : १० गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| १३–१५ | अत्यंत सर्जनशील; पूर्णतः वेगळी व नावीन्यपूर्ण सादरीकरण पद्धत |
| १०–१२ | काही प्रमाणात मौलिकता व कल्पकता |
| ६–९ | सामान्य सादरीकरण, पूर्वानुभवावर आधारित |
| ०–५ | साचेबद्ध, कल्पकतेचा अभाव |

### ५) तांत्रिक बाजू : १० गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| ९–१० | सर्व तांत्रिक घटक कार्यरत; ॲनिमेशन सहज व व्यवस्थित |
| ७–८ | अल्प तांत्रिक अडचण, सादरीकरणावर परिणाम नाही |
| ४–६ | काही तांत्रिक त्रुटी, अनुभवात व्यत्यय |
| ०–३ | अनेक तांत्रिक त्रुटी, सादरीकरणास अडथळा |

### ६) सादरीकरण कौशल्ये १० गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| ९–१० | स्पष्ट संवाद, आत्मविश्वास, वेळेचे उत्तम नियोजन |
| ७–८ | संवाद चांगला, थोड्या वेळेच्या व्यवस्थापनाचा अभाव |
| ४–६ | संवाद साधारण; थोडा संकोच |
| ०–३ | अस्पष्ट संवाद, वेळेचे नियोजन नाही |

### ७) सूचनांचे पालन १० गुण

| गुणांची श्रेणी | निकष |
|---|---|
| ९–१० | सर्व सूचनांचे अचूक पालन, स्वरूप व वेळेचे अचूक पालन |
| ७–८ | बहुतांश सूचनांचे पालन |
| ४–६ | काही महत्त्वाच्या सूचनांचे पालन नाही |
| ०–३ | बहुतेक सूचनांचे उल्लंघन; स्वरूप व वेळ चुकीचे |

**सोबत:**

1) संदर्भ पत्र क्रमांक ४ व ५
2) स्पर्धा यामध्ये शिक्षक नोंद अनुषंगाने गुगल लिंक स्मार्ट pdf
3) शिक्षक व अधिकारी स्पर्धा मार्गदर्शिका

(डॉ. आर. डी. कांबळे)
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
छत्रपती संभाजीनगर

**प्रत:**

1) मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर